NRB INDUSTRIAL

**NIBL/BSE/NSE/43/2020-21** **09th November, 2020**

**National Stock Exchange Ltd.**
**Listing Department**
Exchange Plaza, 5th Floor,
G Block, Bandra-Kurla Complex
Bandra (East), Mumbai-400051
Fax No.:022-26598237/38

**BSE Limited**
**Listing Department**
Sir P.J. Tower, Dalal Street,
Mumbai-400001
Fax No. 022-22723121/3719/2037

**Ref.** : **BSE Scrip Code: 535458; NSE Symbol: NIBL**
**Sub.** : **Newspaper Publications of Financial Results**

Dear Sir / Madam,

Pursuant to Regulation 47 of the Securities and Exchange Board of India (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015, please find enclosed the newspaper publications of Financial Results for the quarter and half year ended 30th September, 2020 of the Company published in Financial Express (English) & Mumbai Lakshadeep (Marathi) newspapers for your record.

Kindly take the above on record and oblige.

Due to prevailing COVID-19 pandemic situation and in the light of "work from home" measures adopted by the Company, this letter is being submitted under sd/-.

Thanking you,
Yours truly,
**For NRB Industrial Bearings Limited**

Sd/-
**Ratika Gandhi**
**Company Secretary**

Encl A/a.

NRB INDUSTRIAL BEARINGS LTD.
REGD. OFFICE : 2ND FLOOR, DHANNUR, 15, SIR P.M. ROAD, FORT, MUMBAI - 400 001. MAHARASHTRA, INDIA.
TEL.: 9122 - 2270 4206 FAX : 9122 - 2270 4207
WEBSITE : http//www.nrbindustrialbearings.com
GSTIN : 27AADCN5657L1ZY

दैनिक रविवार
# मुंबई लक्षदीप
Web : mumbailakshadeep.com
आरएनआय नं. एमएएचएमएआर/२००१/०५४२६ पोस्ट क्र. एन डब्ल्यू/जी/आरएमपी/एमएनडब्ल्यू१९/२०१९-२१
मुंबई | वर्ष : १९ | अंक : ७६ | पृष्ठे : ८ | रविवार दि. ८ नोव्हेंबर २०२० | संपादक : डी. एन. शिंदे | किंमत २ रुपये

अमेरिकन निकालांचे त्रांगडे ६
भक्त ईश्वराने दिलेल्या सामर्थ्याचा दुरुपयोग करीत नाही ६

IN BADLAPUR GAON (W)
1 BHK 14.5 लाख
with Registration, Grill, Garden
POSSESSION
MARCH2021
(D Wing Only)
Rera No.: P51700021856
SAGAR 9130739515/9820446385

# इस्रोचा नवा उपग्रह घेणार शत्रुच्या हालचालींचा वेध



श्रीहरिकोटा, दि.७ : या वर्षीच्या आपल्या पहिल्या उपग्रहाचे भारतीय अंतराळ संशोधन संस्था अर्थात इस्त्रोकडून ७ नोव्हेंबर रोजी प्रक्षेपण केले आहे. शत्रू राष्ट्रावर नजर ठेवण्यासाठी इस्त्रो मएओएस-०१२ अर्थात अर्थ ऑब्जर्वेशन सॅटेलाइटचे प्रक्षेपण करणार आहे. या उपग्रहाचे पीएसएलव्ही-सी ४९ रॉकेटच्या माध्यमातून प्रक्षेपण करण्यात येणार आहे. भारतीय प्रमाणवेळेनुसार हे प्रक्षेपण ७ नोव्हेंबर रोजी दुपारी ३ वाजून २ मिनिटांनी करण्यात आले यासाठीचा काउंटडाऊन शुक्रवारी सुरू झाला आहे.

एओएस-०१ उपग्रह हा शत्रू राष्ट्रावर नजर ठेवण्यासाठी उपयुक्त ठरेल. याच्या सिंथेटिक ऍपर्चर रडारच्या माध्यमातून दिवसा तसेच रात्रीच्या वेळीही शत्रूच्या हालचालीवर नजर ठेवण्यात येणार आहे तसेच हा उपग्रह ढगांच्या अडथळ्यांना भेदून हाय रिझोल्युशनचे फोटो घ्यायला सक्षम आहे. त्यामुळे लष्कराच्या क्षमतेत वाढ होणार आहे. चीनसोबत लडाखच्या सीमेवर सुरू असलेल्या तणावाच्या पार्श्वभूमीवर तसेच पाकिस्तानी घुसखोरीचा मुद्दा लक्षात घेता हा उपग्रह लष्कराला मोठ्या प्रमाणावर फायदेशीर ठरणार आहे.त्याचबरोबर कृषी, वने, भूविज्ञान या क्षेत्रात तसेच किनारी भागातील सुरक्षा मजबूत करण्यासाठीही होणार आहे. या उपग्रहासोबत इतर व्यापारी उपग्रहांचे इस्त्रोच्या न्यूस्पेस इंडिया लिमिटेड सोबतच्या व्यापारी करारांतर्गत प्रक्षेपण करण्यात येणार आहे. या उपग्रहांच्या प्रक्षेपणाचे लाईव्ह टेलिकास्ट (थेट प्रक्षेपण) इस्त्रोच्या वेबसाईट, युट्यूब, फेसबुक आणि ट्विटर चॅनेलवरून करण्यात येणार आहे. कोरोनाच्या संक्रमणामुळे या वर्षी इस्त्रोच्या कामकाजावर मोठ्या प्रमाणात परिणाम झाला होता. त्या पार्श्वभूमीवर या वर्षातील इस्त्रोचे हे पहिले प्रक्षेपण आहे. पीएसएलव्ही सीपीएसएलव्ही-सी ४९ च्या प्रक्षेपणानंतर इस्त्रो लगेचच पीएसएलव्ही-सी ५० या रॉकेटच्या माध्यमातून जी सॅट-१२ टी उपग्रह प्रक्षेपण करणार आहे. त्यानंतर जीआय सॅट-१ उपग्रहाला जीएसएलव्ही रॉकेटच्या माध्यमातून प्रक्षेपित करण्यात येणार आहे.

## शाळांना २० नोव्हेंबपर्यंत दिवाळी सुट्टी जाहीर



मुंबई, दि.७ : दिवाळीच्या काळात फक्त पाच दिवस शाळांना सुट्टी देण्याच्या राज्य सरकारच्या आदेशावर शिक्षक संघटनांनी तीव्र प्रतिक्रिया व्यक्त केल्यानंतर शुक्रवारी आधीच्या आदेशात बदल करून शनिवार ७ ते २० नोव्हेंबपर्यंत शाळांना दिवाळीची सुट्टी जाहीर करण्यात आली.

करोना साथीमुळे जूनपासून ऑनलाइन शिक्षण सुरू करण्यात आले. निश्चित केलेला शैक्षणिक कालावधी कमी होत असल्याने दिवाळीच्या सुट्टीत कपात करण्याचा निर्णय घेण्यात आला होता. यानुसार दिवाळीसाठी १२ ते १६ नोव्हेंबर अशी पाच दिवस सुट्टी देण्याचा आदेश शालेय शिक्षण विभागाने गुरुवारी जारी केला. त्याबद्दल शिक्षक संघटनांमध्ये तीव्र प्रतिक्रिया उमटली. आमदार कपिल पाटील यांच्या नेतृत्वाखाली शिक्षक भारती या संघटनेच्या सदस्यांनी सरकारी आदेशाचे दहन केले.

काही शिक्षक संघटनांच्या पदाधिकाऱ्यांनी शालेय शिक्षणमंत्री वर्षा गायकवाड यांच्याकडे सुट्टी वाढवण्याची मागणी केली. शिक्षक तसेच पालकांमध्ये असलेली नाराजी लक्षात घेऊन सरकारने धोरणात बदल केला आणि नवा आदेश जारी केला.

## पाकिस्तानकडून शस्त्रसंधीचे उल्लंघन, सीमेवर गोळीबार



जम्मू, दि.७ (हिंदुस्थान समाचार) : पाकिस्तानकडून जम्मू-काश्मीरातील सीमा भागातील पुंछ आणि कठुवा जिल्ह्यातील प्रत्यक्ष नियंत्रण रेषेवर पुन्हा एकादा शस्त्रसंधीचे उलंघन करण्यात आलेय. पाकिस्तानने या भागातील गावांवर शुक्रवारी रात्री गोळीबार आणि तोफांचा मारा केल्याची माहिती सैन्यांच्या अधिकाऱ्यांनी, शनिवारी दिली.

पाकिस्तानी सैनिकांनी शुक्रवारी रात्री १० वाजेच्या सुमारास करोल कृष्णा, सतपाल आणि गुरनाम येथे देखील गोळीबार केला. याला भारतीय सीमा सुरक्षा दलाच्या जवानांकडून कडक प्रत्युत्तर देण्यात आले. दोन्ही बाजूंकडून गोळीबार पहाटे ५ वाजून १० मिनिटांपर्यंत सुरू होता.

या गोळीबारात सीमाभागात राहणाऱ्या लोकांमध्ये भीती पसरल्यामुळे यांनी रात्र भूमिगत बंकरमध्ये घालविली याबाबत सैन्याच्या अधिकाऱ्यांनी सांगितले की, माणकोट सेक्टरमध्ये पहाटे अडीचच्या सुमारास पुंछ जिल्ह्यातील एलओसीवर गोळीबार व तोफांचा मारा करण्यात आला. तसेच हीरानगर सेक्टरमध्ये रात्री गोळीबार सुरू होता. या गोळीबारात भारताच्या बाजूने कोणतीही जीवितहानी झाली नाही. पाकिस्तानने केलेल्या गोळीबाराला भारतीय लष्कराने चोख प्रत्युत्तर दिले आहे.


## अर्णब गोस्वामी प्रकरणी रायगड पोलिसांच्या पुनर्निरीक्षण अर्जावर सोमवारी पुढील सुनावणी



अलिबाग, दि.७ (हिंदुस्थान समाचार) : रिपब्लिक वृत्तवाहिनीचे मुख्य संपादक अर्णब गोस्वामी यांच्या संदर्भात जिल्हा सत्र न्यायालयात सुरू असलेली आजची सुनावणी स्थगित करण्यात आली असून ९ नोव्हेंबरला पुढील सुनावणी होणार आहे. त्यामुळे अर्णब यांना आणखी दोन दिवस कोठडीत रहावे लागणार आहे. अतिरिक्त सत्र न्यायाधीश आर.जे. मलशेट्टी यांच्यासमोर सुनावणी पार पडली.

अन्वय नाईक यांच्या आत्महत्येप्रकरणी अर्णब आणि त्यांचे अन्य दोन सहकारी सध्या न्यायालयीन कोठडीत आहेत. गोस्वामी यांच्या न्यायालयीन कोठडीच्या आदेशाला आव्हान देत, रायगड पोलिसांनी सत्र न्यायालयात पुनर्निरीक्षण अर्ज दाखल केला आहे. त्यावर आज सुनावणी होणार होती. अलिबाग पोलिसांकडून जिल्हा सत्र न्यायालयात तिन्ही आरोपींची पोलीस कोठडीची मागणी करण्यात आली. मात्र सुनावणी स्थगित झाली. या अर्जावर सरकार पक्षातर्फे विशेष सरकारी वकील ॲड. प्रदीप घरत यांनी युक्तिवाद केला. विशेष सरकारी वकील ॲड. प्रदीप घरत यांनी सरकार पक्षातर्फे युक्तिवाद सुरू केला. यावर अर्णव गोस्वामी, फिरोज शेख व नितेश सारडा यांचे वकील ९ नोव्हेंबरला युक्तिवाद करतील.

## दिल्लीत पुन्हा कोरोनाचा विळखा




नवी दिल्ली, दि.७ : देशात एकीकडे कोरोना बाधितांची संख्या कमी होताना दिसत आहे तर दुसरीकडे मात्र राजधानी दिल्ली कोरोनाचे हॉटस्पॉट राज्य बनत असल्याचे दिसत आहे. दिल्लीत दिवसेंदिवस मात्र कोरोनाचा विळखा घट्ट होत आहे. दिल्लीत काल या वाढीने नवा विक्रमच नोंदवला आहे. त्यामुळे इथे चिंताजनक परिस्थिती निर्माण होताना पाहायला मिळत आहे. गेल्या २४ तासात दिल्लीत तब्बल ७१७४ नवे कोरोनाबाधित नोंदवण्या आले आहेत. आजवर संपूर्ण देशात २४ तासात वाढलेली हा सर्वात मोठा आकडा आहे. दोन दिवसांपूर्वीच केरळमध्ये ७००२ रुग्णांची नोंद झाली होती. दिल्लीने त्याच्या पुढेही मजल मारली आहे.

जुलै महिन्यात कोरोनावर प्रभावी नियंत्रण केले म्हणून दिल्ली मॉडेलची चर्चा सुरु होती. पण आता परिस्थिती पूर्ण बदलली आहे. ज्या दिल्लीत अगदी मागच्या दहा दिवसांपर्यंत दिवसाला दोन-अडीच हजार पेशंट सापडत होते, तो आकडा वेगाने दुप्पट तिप्पट होऊ लागला आहे. वाढती थंडी, प्रदूषण आणि सणासुदीच्या तोंडावर लोकांचा निष्काळजीपणा अशी तीन कारणं दिल्लीतल्या वाढीमागे सांगितली जात आहेत. पुढचे तीन महिने दिल्ली, उत्तर भारतासाठी धोक्याचे आहेत असेही तज्ज्ञ म्हणत आहेत. त्यात मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांनी सर्व बंधनं तातडीने शिथील केली होती. मुंबईत आता कुठे हॉटेल, रेस्टॉरंट सुरु आहेत. दिल्लीत सप्टेंबरपासूनच सुरु झाली. दिल्लीतली मेट्रो ७ सप्टेंबरपासूनच सुरु झाली होती. दिल्लीत कोरोनाची आता तिसरी लाट सुरू झाली आहे, असे आरोग्यमंत्री सत्येंद्र जैन यांनी प्रसार माध्यमांशी बोलताना सांगितले. सत्येंद्र जैन यांनी पत्रकार परिषद घेत दिल्लीतील कोरोना स्थितीची माहिती दिली. तसेच यावेळी त्यांनी सरकारची तयारी आणि घटत्या आयसीयू बेडची देखील माहिती दिली. दिल्लीत कोरोनाची तिसरी लाट आली असून लवकरच यातून बाहेर येऊ, असे सत्येंद्र जैन म्हणाले. तसेच जोपर्यंत लस उपलब्ध होत नाही तोपर्यंत मास्कलाच लस समजा, असे म्हणत त्यांनी सर्वांना मास्क वापरण्याचे आवाहन केले.

## फटाक्यांवर कायमची बंदी आणा, काँग्रेसची आदित्य ठाकरेंकडे मागणी

मुंबई , दि.७ : प्लॅस्टिकप्रमाणेच मोठ्या आवाजाच्या आणि धूर करणाऱ्या फटाक्यांवर कायमची बंदी घालावी, अशी मागणी महाराष्ट्र युवक काँग्रेसचे अध्यक्ष सत्यजित तांबे यांनी पर्यावरण मंत्री आदित्य ठाकरे यांना केली आहे. कोरोनाचे संकट लक्षात घेता अनेक राज्यात फटक्यांवर बंदी घालण्याचा निर्णय घेण्यात आला. त्याचप्रमाणे महाराष्ट्रात देखील यावर बंदी घालावी, अशी म ागणी सत्यजित तांबे यांनी ट्विटरद्वारे केली आहे.

सत्यजित तांबे यांनी ट्विट करत म्हटले की, पर्यावरण मंत्री आदित्य ठाकरे यांना विनंती, कृपया मोठे आवाज करणाऱ्या व धूर करणाऱ्या फटाक्यांवर, प्लॅस्टिकवर ज्या पध्दतीने बंदी घातली, त्याप्रमाणे कायमस्वरुपी बंदी घाला. पुढच्या येणाऱ्या सात पिढ्या आपल्याला आशिर्वाद देतील. यावर आता पर्यावरण मंत्री आदित्य ठाकरे काय भूमिका घेतात हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे. दिवाळी हा सण अवघ्या काही दिवसांवर आला आहे. यानिमित्त सरकारने मार्गदर्शक सूचना जारी केल्या आहेत. यंदा नागरिकांनी साध्या पद्धतीने दिवाळी साजरी करण्याचे आवाहन सरकारने केले आहे.

कोरोनाचे सावट यंदाच्या दिवाळीवर देखील आहे. फटाक्यांमुळे होणाऱ्या प्रदूषणामुळे कोरोनाचे संक्रमण वाढण्याची भीती आहे. तसेच फटाक्यांच्या धुरामुळे कोरोना रुग्णांना त्रासही होऊ शकतो. त्यामळे खबरदारी म्हणून दिल्ली आणि राजस्थान आदी राज्यांत यंदा दिवाळीत फटाक्यांवर बंदी घालण्यात आली आहे. महाराष्ट्रातील कोरोनाचा प्रादुर्भाव पाहता राज्यातही फटाक्यांवर बंदी आणावी अशी मागणी आता केली जात आहे.

## मराठी सिनेमा आणि महाराष्ट्रातील सिनेमागृहांचे पुनर्जीवित करण्याला राज्य शासन प्राधान्य देणार

मुंबई, दि. ७ : काही वर्षांपूर्वी मराठीत नवीन काही येत नाही असे म्हटले जात होते पण आज मराठी सिनेमा पाहायलाच पाहिजे, अशी परिस्थिती निर्माण झाली आहे हे मराठी सिनेमांचे यश आहे. त्यामुळे येणाऱ्या काळात मराठी सिनेमांचे आणि महाराष्ट्रातील सिनेमागृहांचे पुनर्जीवित करण्याला राज्य शासन प्राधान्य देईल असे महसूल मंत्री बाळासाहेब थोरात यांनी स्पष्ट केले.

महाराष्ट्र चित्रपट रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळातर्फे ५ ते ७ नोव्हेंबर या कालावधीत मर्पनोरमा इन्वीशनिंग फ्लिम मीडिया अँड एन्टरटेनमेन्ट पॉलिसी फॉर महाराष्ट्रफ या विषयावर तीन दिवसीय ऑनलाईन चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते. या चर्चासत्राच्या समारोप सत्रात महसूल मंत्री बाळासाहेब थोरात यांच्यासह सांस्कृतिक कार्य मंत्री अमित देशमुख,सांस्कृतिक कार्य विभागाचे सचिव सौरभ विजय, महाराष्ट्र चित्रपट रंगभूमी आणि



सांस्कृतिक विकास महामंडळाच्या व्यवस्थापकीय संचालिका मनीषा वर्मा, सहसंचालिका आंचल गोयल, यांच्यासह अशोक राणे, नानू जयसिंघानी, वर्षा उसगावकर, अमित भंडारी आदी मान्यवर उपस्थित होते.

महसूल मंत्री श्री थोरात म्हणाले की, आज मराठी सिनेमा गावागावात पोहोचणे आवश्यक असून यासाठी प्रयत्न होणे गरजेचे आहे. सध्याच्या परिस्थितीत ऑनलाईन माध्यमाचा वापर करून अशा वेगळ्या पद्धतीचे चर्चासत्र आयोजित करण्यात आले याचा आनंद होत आहे. तीन दिवस सादर करण्यात आलेल्या चर्चासत्रात वेगवेगळ्या विषयांवर चर्चा झाली आहे. त्यामुळे मनोरंजन क्षेत्रासाठी धोरण ठरत असताना या सगळ्या बाबींचा विचार करून एक सर्वसमावेशक धोरण तयार करण्याचा राज्य शासन प्रयत्न करणार आहे. चित्रपट, माध्यम व करमणूक धोरण आखण्यासाठी या विषयातील तज्ञांकडून ठोस सूचना मिळतील असा विश्वास श्री. थोरात यांनी यावेळी व्यक्त केला. मराठी सिनेमा, कला,नाट्य आणि साहित्य क्षेत्र प्रचंड समृद्ध आहे. दाक्षिणात्य आणि हिंदी सिनेमाबरोबर आज मराठी सिनेमा स्पर्धा करीत असतो. मराठी सिनेमा निर्मिती, दिग्दर्शित करणारे खूप प्रतिकूल परिस्थितीशी संघर्ष करून अनेक संकटांना सामोरे जाऊन वेगळी कलाकृती तयार करण्याचे धाडस दाखवतात याचा आनंद वाटतो. येत्या काळातही आपल्या सगळ्यांनी वेगवेगळ्या कलाकृती निर्माण कराव्यात, याकरिता महाविकास आघाडीचे शासन आपल्या पाठीशी आहे, असेही महसूल मंत्री बाळासाहेब थोरात यांनी यावेळी सांगितले.

NRB INDUSTRIAL

**एनआरबी इंडस्ट्रियल बेअरिंग्ज लिमिटेड**

सीआयएन : L2925MH2011PLC213963
नोंदणीकृत कार्यालय : २ रा मजला, धन्नूर, १५, सर पी.एम. रोड, फोर्ट, मुंबई - ४०० ००१.
दूर. क्र. : ०२२ - २२७० ४२०६, फॅक्स क्र. : ०२२-२२७० ४२०७
ई-मेल : investorcare@nibl.in वेबसाइट : www.nrbindustrialbearings.com

(रु. लाखांत)

दि. ३०.०९.२०२० रोजी संपलेली तिमाही व सहामाहीकरिताच्या स्थायी व एकत्रित अलेखापरीक्षित वित्तीय निष्कर्षांच्या अहवालाचा सारांश

| तपशील | स्थायी | | | एकत्रित | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | तिमाहीअखेर | अनुषंगिक तिमाहीअखेर | वर्ष ते दिनांक सहामाहीअखेर | तिमाहीअखेर | अनुषंगिक तिमाहीअखेर | वर्ष ते दिनांक सहामाहीअखेर |
| | ३०.०९.२० | ३०.०९.१९ | ३०.०९.२० | ३०.०९.२० | ३०.०९.१९ | ३०.०९.२० |
| | (अलेखापरीक्षित) | (अलेखापरीक्षित) | (अलेखापरीक्षित) | (अलेखापरीक्षित) | (अलेखापरीक्षित) | (अलेखापरीक्षित) |
| परिचालनातून एकूण उत्पन्न | १,५०३.०० | १,१०२.५२ | २,०९०.०२ | १,५०३.०० | १,१०२.५२ | २,०९०.०२ |
| करपूर्व तोटा | (१८३.५६) | (७००.८६) | (५५९.७७) | (१८३.५६) | (७००.८६) | (५५९.७७) |
| करपश्चात तोटा | (१८३.५६) | (७००.८६) | (५५९.७७) | (१८३.५६) | (७००.८६) | (५५९.७७) |
| सहयोगींचा नफा/(तोटा) यांचा हिस्सा | - | - | - | ८.५७ | ३.२७ | ८.४६ |
| कर व सहयोगींच्या नफ्याच्या हिश्श्यापश्चात तोटा | (१८३.५६) | (७००.८६) | (५५९.७७) | (१९२.१३) | (७०४.१३) | (५६८.२३) |
| अन्य सर्वसमावेशक उत्पन्न (ओसीआय) | १२.७४ | २.४६ | २५.४८ | ११.९५ | २.०१ | २३.९० |
| कालावधीकरिता एकूण सर्वसमावेशक उत्पन्न | (१९६.३०) | (७०३.३२) | (५८५.२५) | (२०४.०८) | (७०६.१४) | (५९२.१३) |
| प्रदानित समभाग भांडवल (रु. २/- प्रतिशेअरचे दर्शनी मूल्य) | ४८४.६१ | ४८४.६१ | ४८४.६१ | ४८४.६१ | ४८४.६१ | ४८४.६१ |
| प्रत्येकी रु. २ /- चे उत्पन्न प्रतिशेअर (अवार्षिकीकृत) मूलभूत व सौम्यीकृत (रु.) | (०.७६) | (२.८९) | (२.३१) | (०.७९) | (२.९१) | (२.३४) |

टीप :
१) वरील तपशील हा सेबी (सूचिबद्धता अनिवार्यता व विमोचन आवश्यकता) विनियमन, २०१५ च्या विनियमन ३३ अंतर्गत स्टॉक एक्सचेंजेसकडे दाखल करण्यात दि. ३०.०९.२०२० रोजी संपलेली तिमाही व सहामाहीकरिताच्या स्थायी अलेखापरीक्षित वित्तीय निष्कर्षांच्या तसेच दि. ३०.०९.२०२० रोजी संपलेली तिमाही व सहामाहीकरिताच्या एकत्रित वित्तीय निष्कर्षांच्या अहवालाच्या विस्तृत प्रारूपाचा सारांश आहे. स्थायी व एकत्रित अलेखापरीक्षित वित्तीय निष्कर्षांचे संपूर्ण प्रारूप स्टॉक एक्सचेंजेसच्या वेबसाइट्स अर्थात www.bseindia.com व www.nseindia.com वर तसेच कंपनीची वेबसाइट www.nrbindustrialbearings.com वरही उपलब्ध आहे.
२. दि. ३०.०९.२०२० रोजी संपलेली तिमाही व सहामाहीकरिताच्या कंपनी व त्यांच्या सहयोगींच्या वरील स्थायी व एकत्रित वित्तीय निष्कर्षांचे लेखापरीक्षण समितीद्वारे पुनरावलोकन करण्यात आले होते, संचालक मंडळाद्वारे त्यांच्या दि. ०७.११.२०२० रोजी आयोजित सभेत मंजुरी देण्यात आली होती. कंपनीच्या वैधानिक लेखापरीक्षकांनी अलेखापरीक्षित स्थायी व एकत्रित वित्तीय निष्कर्षांचे मर्यादित पुनरावलोकन केले आहे.

संचालक मंडळाच्या आदेशाद्वारे
सही/-
देवेश साहनी
अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक

ठिकाण : मुंबई
दिनांक : ०७.११.२०२०